MHST020007822026	**नियमित दिवाणी दावा क्रमांक २५२/२०२६** **अक्षय हणमंत कदम व इतर** **विरुद्ध** **शशिकांत दिनकर कदम वगैरे**

नि.क्र. ५ वरील आदेश

(दिनांक ०५.०८.२०२६)

प्रस्तुतचा अर्ज वादी यांनी दिवाणी प्रक्रिया संहिता कलम १५१ व क्रम ३९ नियम १ व २ प्रमाणे प्रतिवादी यांनी वादीचे मिळकतीत हरकत अडथळा करुन बेकायदेशीरपणे बांधकाम करु नये व रस्त्याने येणे जाणेस हरकत अडथळा करु नये यासाठी दाखल केलेला आहे.

दावा मिळकत –

०२. १अ. मौजे मालगाव ता.जि.सातारा येथील गट नं. १६ याचे एकुण क्षेत्र ०हे.०३आर. आकार रु. ०.६६ पैसे ज्याच्या चतुर्सिमा पुर्वेस मस्जीद, पश्चिमेस स.नं. ६८१ (गावठाण), दक्षिणेस गट नं. १७, उत्तरेस गट नं. १५

१ब. गट नं. १६ चे पश्चिम बाजुस जाणे येणेकरिता सर्वे क्र. ६८१ च्या दक्षिण बाजुस सामाईकात येणे जाणेकरिता आठ फुट ठेवण्यात आलेला रस्ता (बोळ) सदर रस्त्यावर प्रतिवादी यांनी खड्डे खांदुन येणेजाणेस हरकत अडथळ केला आहे. सदरील बोळाच्या चतुर्सिमा पुर्वेस गट नं. १६ चे क्षेत्र, पश्चिमेस सामाईक चौक व रस्ता, दक्षिणेस गट नं. १७ चे क्षेत्र, उत्तरेस प्रतिवादी यांचे सिटी सर्वे क्र. ६८१ व त्यामधील घर

(सदरील मिळकत १अ व १ब यांना यापुढे सोयीसाठी दावा मिळकत असे संबोधण्यात येईल.) गटाच्या क्षेत्रामध्ये पुर्व पश्चिम असे हिस्से असुन सदर गट क्र. १६ चे पश्चिम बाजुस वादी यांच्या घर मिळकती असुन त्यामध्ये येणे जाणेसाठी दक्षिणोत्तर असा सामाईक रस्ता आहे. सदर रस्त्यावरती प्रतिवादी यांनी दोन फुट एवढ्या क्षेत्रात अतिक्रमण करुन बांधकाम खड्डे काढलेले आहे. वादी यांचा रस्ता अडविला तो या दाव्याचा वाद विषय आहे.

<u>अर्जातील कथने</u> –

०३. अर्जातील कथने थोडक्यात अशी की, वाद मिळकतीत या वादी व प्रतिवादी यांच्या सामाईक वहिवाटीच्या असुन त्याचे वाटप फार वर्षांपुर्वी झालेले आहे. आता वादी व प्रतिवादी यांच्या दावा मिळकतीत स्वतंत्र वहिवाटी आहेत. सिटी सर्वे क्र. ६८१ मध्ये प्रतिवादी यांची घर मिळकत असुन त्यांचे दक्षिण बाजुने पुर्व बाजुस वादी यांचे क्षेत्रामध्ये जाण्यास सामाईक रस्ता (बोळ) सोडण्यात आले. त्याचा उल्लेख पुर्वी झालेल्या १००/– रुपयेच्या स्टॅम्पवरील संमतीपत्र व वाटपपत्र यामध्ये करण्यात आलेला आहे.

०४. दावा मिळकत १अ मध्ये वादी प्रतिवादी यांचे पुर्व पश्चिम असे हिस्से असुन वादी यांनी त्यामध्ये त्यांची घरी बांधली असुन ग्रामपंचायत रेकॉर्डला तशा नोंदी झालेल्या आहेत. सदर घर मिळकतीमध्ये येणे जाणेकरिता वादी यांनी त्यांचे हिश्याच्या

क्षेत्रामधुन पश्चिम बाजुस दक्षिण उत्तर असा रस्ता सोडला आहे. सदर क्षेत्राचे पश्चिम बाजुस प्रतिवादी क्र. २ व ३ यांची घर मिळकत आहे.

०५. वर नमुद केलेप्रमाणे वादी व प्रतिवादी यांच्या वहिवाटी असताना गेल्या १५ दिवसापासुन प्रतिवादी यांनी अतिक्रमण करुन सामाईकातील बोळामध्ये शौचालय बांधण्याकरिता खड्डे खांदलेले आहेत व त्यामुळे वादी यांच्या येण्या जाण्याचा संपुर्ण रस्ता बंद झालेला आहे. तसेच जोर जबरदस्तीन गट नं. १६ मधील रस्त्यामध्ये देखील प्रतिवादीने कोणत्याही संयुक्तिक कारणाशिवाय खड्डे काढलेले आहेत. तसेच पिण्याच्या पाईपलाईन तोडलेल्या आहेत व नुकसान केलेले आहे. याबाबत वादीयांनी प्रतिवादी यांना विचारणा केली असता त्यांनी यापुढे येथुन जाणे येणेचे नाही. ही जागा आमची आहे, मी रस्ता बंद केलेला आहे आणि याच ठिकाणी बांधकाम करणार तुम्हाला काय करायचे ते करा असे म्हणाले. वादी हे सदरील वाद रस्त्याचा वापर बऱ्याच दिवसापासुन करत आलेले आहेत. असे असतानाही प्रतिवादी यांनी बेकायदेशीरपणे बांधकामासाठी खड्डे खणलेले आहेत. सदर प्रतिवादी यांनी दावा मिळकतीमध्ये बांधकाम केल्यास वादी यांचा जाण्यायेण्याचा रसता बंद होणार आहे त्यामुळे वादी यांचे कशानेही न भरुन येणारे नुकसान होणार आहे. सबब प्रतिवादी यांनी वादीचे मिळकतीत हरकत अडथळा करुन बेकायदेशीरपणे बांधकाम करु नये व रस्त्याने येणे जाणेस हरकत अडथळा करु नये म्हणुन त्यांना तुर्तातुर्त ताकीद द्यावी अशी विनंती त्यांनी केलेली आहे.

<u>अर्जावर प्रतिवादी क्र. १ ते ३ यांचे म्हणणे थोडक्यात–</u>

०६. सदर अर्जावर प्रतिवादी क्र. १ ते ३ यांनी निशाणी १५ कडे म्हणणे दाखल करुन प्रस्तुत अर्जास सक्त हरकत घेतली आहे. त्यांच्यामते ताकीद अर्ज कलम १अ मध्ये पुर्वेस मस्जीद अशी दिलेली चतु:सिमा ही चुकीची आहे. वस्तुस्थीतीप्रमाणे पुर्वेस मालगाव ते राऊतवाडी असा डांबरी रस्ता आहे. त्यांनी गट नं. १६ च्या पश्चिम बाजुस दक्षिणोत्तर असा सामाईक रस्ता असल्याचे नाकारले आहे. गट नं. १६ मध्ये उत्तर बाजुचा १/३ हिस्सा पुर्वी झालेल्या वाटपाने वादी क्र. २ व त्यांच्या कुटुंबाचा आहे. त्याच्या दक्षिण बाजुचा १/३ हिस्सा वादी क्र. १, प्रतिवादी क्र. २ व ३ वगैरे यांच्या एकत्रित कुटुबांचा आहे त्यांचे दक्षिण बाजुच्या १/३ हिस्सा आहे प्रतिवादी क्र.१ व त्यांच्या एकत्रित कुटुबांचा आहे. वादी यांची घरे गट क्रमांक १६ च्या पश्चिम बाजुस नसुन ती गट क्रमांक १६ मध्येच आहेत. त्यांना येण्या जाण्याचा रस्ता पुर्व बाजुच्या मालेगाव ते राउतवाडी रस्त्यावरुन आहे. गट नंबर १६ मध्ये पश्चिम बाजुस जाणे येणेकरिता सि.स.न ६८१ च्या दक्षिण बाजुने केव्हाही सामाईक रस्ता नव्हता व नाही. प्रतिवादीने वादीच्या तथाकथीत रस्त्यावर कधीही खडडे खणुन हरकत अडथळा केला नव्हता व नाही. दावा कलम १ ब मध्ये दावा मिळकतीचे दक्षिण बाजुची नमुद केलेली चतु:सिमा चुकीची असुन प्रत्यक्ष त्या ठिकाणी भास्कर कदम यांची पश्चिममुखी घर मिळकत आहे. सि.स.नं ६८१ मध्ये कोणत्या प्रतिवादी यांची घर मिळकत आहे याचा वादीने अर्जात उल्लेख केलेला नाही. वादी यांनी कथन केलेला रक्कम रुपये १००/–

रुपयांच्या स्टॅम्प वरील संमतीपत्र वाटपपत्राचा कागद प्रस्तुत प्रकरणात दाखल केलेला नाही. दावा मिळकत १अ मध्ये वादी, प्रतिवादींचे पुर्व पश्चिम असे हिस्से असुन वादी यांनी तयामध्ये आपली घरे बांधली असुन ग्रामपंचायत अभिलेखाला नोंदी आहेत. तथापी गट नं. १६ च्या पश्चिम बाजुस प्रतिवादी क्र. २ व ३ यांची घर मिळकत आहे. वादी म्हणतात तसे या प्रतिवादींनी तथाकथित सामाईक बोळामध्ये संडास बांधण्याकरिता खड्डे खांदले नाहीत अगर वादीचा तथाकथित रस्ता बंद केलेला नाही, अगर पाण्याची पाईप तोडलेली नाही त्यामुळे वादीने तंटामुक्तीकडे दिलेला अर्ज खोटा व लबाडीचा असल्याने त्यावर तंटामुक्ती समितीने कोणताही निर्णय दिलेला नाही. तथाकथित रस्ता पुर्वीपासुन कधीही अस्तित्वात नव्हता व नाही अगर तो कोणत्याही प्रतिवादींनी बंद केलेला नाही. प्रतिवादी क्र. १ हे त्यास वाटपाने आलेल्या १/३ हिश्यात त्याच्या घराचे बांधकामाचे नियोजन करत आहे, त्यास वादींना कायद्याने हरकत घेता येणार नाही अगर प्रतिवादीच्या नियोजित बांधकामामुळे वादीचा कोणताही रस्ता बंद होत नाही त्यामुळे वादीचे कोणतेही नुकसान होत नाही.

०७. वादीने रस्त्याबाबतचा कागदोपत्री व अधिकृत पुरावा दाखल केलेला नाही. वादीने दाव्या सोबत सोईचा, खोटा व लबाडीचा हस्तकेच नकाशा दाखल केलेला आहे. सदर वादी व प्रतिवादीचे पुर्वज गुलाब, दिनकर व तुकाराम यांच्यामध्ये सन १९६६ च्या सुमारास दावा मिळकत गट नं. १६ सह इतर शेतजमीन व घर मिळकतीचे वाटप होवुन तेव्हा पासुन प्रत्येकाच्या अलग व तुटक वहिवाटी आहेत. त्याप्रमाणे ७/१२

ला त्यांच्या व त्यांच्या वारसांच्या स्वतंत्र आणेवारीत नोंदी आहेत. दावा मिळकत गट नं. १६ ही पुर्व पश्चिम लांबीची असुन सदर वाटपाने गट नं. १६ मधील उत्तर बाजुचे पुर्व पश्चिम लांबीची असुन सदर वाटपाने गट नं. १६ मधील उत्तर बाजुचे पुर्व पश्चिम लांबीचे १ आर क्षेत्र याची रुंदी १९ फुट वादी क्र. २ यांचे पुर्वज तुकाराम यांना वाटपाने मिळाली असुन त्यामध्ये वादी क्र. २ यांचे पुर्वमुखी घर मिळकत आहे. त्याच्या दक्षिण बाजुचे पुर्व पश्चिम लांबीचे १ आर क्षेत्र याची रुंदी १९ फुट वादी क्र. १ चे आजोबा गुलाब यांना वाटपाने मिळाले असुन त्यामध्ये पश्चिम भागात वादी क्र. १ चे पश्चिममुखी घर असुन त्याच हिश्यात वादी क्र. १ च्या घरास पुर्वेस लागुन वादी क्र. १ चे मयत चुलते मानसिंग यांची मुले रत्नाकर, हेमंत, मानसिंग कदम यांचे पुर्वमुखी घर आहे. वादी क्र. १ हा सदर रत्नाकर व हेमंत यांच्या बांधीव घर मिळकतीच्या दक्षिण बाजुस असलेल्या बोळातुन पुर्व बाजुच्या दक्षिण उत्तर रस्त्यावर त्याची येण्या जाण्याची गटाराचे व सांडपाणी वाहुन जाण्याची पुर्वीपासुन आज अखेर कब्जेवहिवाट होती व आहे. सदर गुलाब यांना वाटपात आलेल्या हिश्याच्या दक्षिण बाजुचे पुर्व पश्चिम लांबीचे १ आर क्षेत्र हिस्सा याची रुंदी १९ फुट, प्रतिवादी क्र. १ चे वडील दिनकर यांना वाटपाने मिळाली असुन त्यामध्ये दिनकर यांची मुले प्रतिवादी क्र. १ शशिकांत यांचे इतर भाऊ मयत मधुकर, उत्तम, माधव यांच्या वारसांची एकत्र कुटुंबाची त्यामध्ये गंज, गोठा, उकीरडा घालुन तसेच कपडे, धान्य वाळवणे, जळण काटुक ठेवणे अशी पुर्वीपासुन आजअखेर कब्जेवहिवाट होती व आहे व तशा सर्वांच्या ७/१२ ला नोंदी आहेत. तसेच सदर हिश्यात प्रतिवादी क्र. १

यांनी उत्तर भागात एक नारळाचे झाड सुमारे १५ वर्षांपुर्वी लावलेले असुन त्याची फळे प्रतिवादी क्र. १ व त्यांचे कुटुंबिय घेत आहेत. याशिवाय सदर नारळाच्या झाडाच्या पुर्वेस आणि पश्चिमेस लागुन या प्रतिवादीने जास्वंद, गुलाब, मेहंदी अशी फुलझाडे लावलेली आहेत अशी प्रतिवादी क्र. १ व त्यांच्या एकत्र कुटुंबाची दक्षिण बाजुच्या १ आर क्षेत्रात पुर्वपासुन आजअखेर मालकी हक्काने कब्जेवहिवाट आहे, असे असताना अलीकडे वादी क्र. १ याने प्रतिवादी क्र. १ व त्याचे कुटुंबियांचे हरकतीस न जुमानता प्रतिवादी क्र. १ च्या दक्षिणेकडील हिश्यात उत्तर भागात मार्च २०२६ च्या शेवटच्या आठवड्यात दांडगाव्याने तीन पायऱ्या घालुन अतिक्रमण केले आहे. तसेच त्यांचे बाथरुमचे, गटाराचे सांडपाणी मुद्दाम या प्रतिवादी क्र. १ च्या १ आर क्षेत्रात पश्चिम भागात उत्तर–पश्चिम कोपऱ्यात अनाधिकाराने दांडगाव्याने सोडुन प्रतिवादी क्र. १ च्या दावा मिळकत गट नं. १६ मधील दक्षिण बाजुच्या १/३ हिश्यातील वहिवाटीस दांडगाव्याने हरकत अडथळ करुन नविन बांधकामास आडकाठी केलेली आहे. वादी क्र. १ यांनी या प्रतिवादी क्र. १ व त्यांचे कुटुंबियांचे दक्षिण बाजुचे १/३ हिश्यातील वहिवाटीस नाहक हरकत अडथळ करुन व त्यांचे जाणीवपुर्वक नुकसान करुन वादी क्र. १ व २ ने संमनमतानी सदरचा खोटा व लबाडीचा दावा करुन त्यास खोटा व लबाडीचा तुर्तातुर्त ताकीद अर्ज दिला आहे. अशा परिस्थितीत वादीचा तुर्तातुर्त ताकीद अर्ज फेटाळल्यास वादीचे कोणतेही नुकसान होणार नाही अगर तथाकथित रस्ता बंद होणार नाही. याचे कारण तिनही हिस्सेदारास पुर्वेच्या रस्त्याचा फ्रंट आहे. या उलट तुर्तातुर्त ताकीद अर्ज मंजुर केल्यास

या प्रतिवादींच्या हिश्यावर फार व मोठा व कायमचा परिणाम होवुन त्यांचे कधीही न भरुन येणारे कायमचे नुकसान होणार आहे. त्यामुळे वादी यांनी प्रतिवादी क्र. १ यांचेविरुध्द केलेली रस्त्याबाबतची तक्रार अनाधिकाराची व बेकायदेशीर असल्याने सदरचा तुर्तातुर्त ताकीद अर्ज फेटाळण्यात यावा अशी विनंती प्रतिवादी क्र. १ ते ३ यांनी केली आहे.

०८. वादी व प्रतिवादी यांचे विव्दान विधीज्ञांचा युक्तिवाद ऐकला. वादी यांचेवतीने मा. सर्वोच्च न्यायालय यांचेकडील **Gangubai Babiya Chaudhary and Ors. Vs. Sitaram Bhalchandra Sukhtankar and Ors AIR 1983(SC) 742** या केस मधील न्यायनिवाड्याचा संदर्भ दिला असुन सदरील केस लॉ च्या अनुषंगाने त्यांनी असा युक्तिवाद केला की, जर मालकी विषयी वाद असेल आणि त्यामध्ये विवादीत क्षेत्राचा काही भाग हा प्रतिवादी यांचेकडे असल्याचे दिसल्यास तुर्तातुर्त मनाई देत असताना संपुर्ण मिळकतीवर बांधकाम करण्यापासुन प्रतिवादीस प्रतिबंधित करता येईल. मा. सर्वोच्च न्यायालयाकडील वरील केस लॉ मधील निष्कर्ष हे या न्यायालयावर बंधनकारक आहेत. परंतु प्रस्तुत केसमध्ये असणाऱ्या बाबी व मा. सर्वोच्च न्यायालय यांचेकडील वरील केस लॉ मधील बाबी या भिन्न असल्याने सदरील केस लॉ मधील निष्कर्षाचा फायदा वादी यांना होणार नाही.

०९. वादी यांचेवतीने पुढे मा. उच्च न्यायालय मुंबई यांचेकडील

Mangalam Group a Partnership Firm and Ors. Vs. Nandkumar Bhalchandra Bhondve and Ors. 2013(1) **ABR** 331 या खटल्यातील न्यायनिवाड्याचा संदर्भ देत युक्तिवाद केला की, तुर्तातुर्त मनाई ही दाव्याची विषय वस्तु जतन करुन ठेवणेसाठी देणे आवश्यक आहे. त्यासाठी प्रथमदर्शनी केस, न्यायाचा तराजु व न भरुन येणारे नुकसान याबाबींचा विचार होणे आवश्यक आहे. सदरील केस लॉ मधील निष्कर्ष हे या न्यायालयावर बंधनकारक आहेत. परंतु मा. उच्च न्यायालय यांचेकडील वरील केस लॉ मधील बाबी व प्रस्तुत केस मधील बाबी या भिन्न असल्याने सदरील केस लॉ मधील निष्कर्षाचा फायदा वादी यांना होणार नाही.

१०. वादी यांचेवतीने पुढे मा. उच्च न्यायालय केरळा यांचेकडील **Muthu Alias Vava Vs. Ammalu and Ors.** (1993) **AIR** (**Kerala**) 272 या खटल्यातील न्यायनिवाड्याचा संदर्भ देत युक्तिवाद केला की, सहमालकास दावा मिळकतीचा उपभोग घेणे गैरसोयीचे होत असेल तर त्यावेळी तुर्तातुर्त मनाई देणे आवश्यक आहे. सदरील केस लॉ मधील निष्कर्ष हे या न्यायालयावर बंधनकारक आहेत. परंतु मा. केरळ उच्च न्यायालय यांचेकडील वरील केस लॉ मधील बाबी व प्रस्तुत केस मधील बाबी या भिन्न असल्याने सदरील केस लॉ मधील निष्कर्षाचा फायदा वादी यांना होणार नाही.

११. अर्जातील कथनांवरुन प्रस्तुत प्रकरणात खाली नमुद मुद्दे माझे विचारार्थ

उपस्थित झालेले आहेत. त्यावरील माझे निष्कर्ष मी खाली नमुद कारणमिमांसेसह देत आहे.

अ.क्र.	मुद्दे	निष्कर्ष
१.	प्रथमदर्शनी केस वादीने सिध्द केली आहे का ?	... नकारार्थी .
२.	न्यायाचा समतोल वादीचे बाजुने आहे का ?	... नकारार्थी .
३.	जर तुर्तातुर्त ताकिदीचा हुकुम केला नाही तर वादीचे अपरिमित नुकसान होणार आहे का ?	... नकारार्थी .
४.	आदेश काय ?	अंतिम आदेशाप्रमाणे

कारणमिमांसा

१२. वादी यांचे वतीने प्रस्तुत अर्जाच्या पुष्टयर्थ वादी यांनी निशाणी ३ सोबत मौजे मालगांव ता.जि.सातारा गट नं. १६ चा सातबारा उतारा, सिटी सर्वे क्र. ६८१ चा मालमत्ता उताऱ्याची छायांकित प्रत, सिटी सर्वे क्र. ६८१ चा कारणापुरता नकाशा, वादी यांनी दिलेली पोलिस ठाण्यातील तक्रार, वादी यांनी ग्रामपंचायतीकडे दिलेला अर्ज व दावा मिळकतीचे फोटो इत्यादी कागद दाखल केले आहेत. तसेच वादी यांनी निशाणी क्र. १९ सोबत मालगांव ग्रामपंचायत यांचेकडील प्रतिवादी यांना दिलेले पत्र तसेच दिनांक २२.०६.२०२६ रोजी दिलेली तक्रार इत्यादी कागदपत्रे दाखल केलेली आहेत.

१३. प्रतिवादी यांनी त्यांचे म्हणणेचे पृष्ठयर्थ निशाणी क्र. २१ सोबत ग्रामपंचायत रस्ता नोंदवहीतील नक्कल, फेरफार क्र. २३६५, वादी यांचे विरुध्द दाखल केलेली अदखलपात्र तक्रार, प्रतिवादी यांच्या जागी सोडलेले सांडपाणी, पाईपव्दारे

गटाराला सोडणेसाठी वादी क्र. १ ला ग्रामपंचायतीने दिलेले पत्र इत्यादी कागदपत्रे दाखल केलेली आहेत.

<u>मुद्दा क्र. १ ते ३ बाबतः</u>

१४. मुद्दा क्र. १ ते ३ हे स्वतंत्र असले तरी देखील ते एकमेकांशी संलग्न असल्यामुळे कारणमिमांसेत येणाऱ्या कथनांची पुनरावृत्ती टाळण्यासाठी सदरचे तिन्ही मुद्दे एकत्रात विवेचनासाठी घेण्यात आले आहेत.

१५. प्रस्तुतचा अर्ज वादी यांनी प्रतिवादी यांचेविरुध्द प्रतिवादी यांनी वादीचे मिळकतीत हरकत अडथळा करुन बेकायदेशीर बांधकाम करु नये व रस्त्याने येणे जाणेस हरकत अडथळा करु नये म्हणुन त्यांना तुर्तातुर्त ताकीद द्यावी यासाठी दाखल केला आहे.

१६. प्रतिवादी यांनी सदर अर्जावर म्हणणे दाखल करुन अर्जास हरकत घेतली आहे. त्यांच्या मते वादी व प्रतिवादी यांचेमध्ये दावा मिळकत गट क्र. १६ सह इतर शेतजमीनी व गट मिळकतींचे वाटप होवुन तेंव्हापासुन प्रत्येकाच्या अलग व तृटक वहिवाटी आहेत. वादीस तो कथन करत असलेप्रमाणे प्रतिवादींच्या मिळकतीमधुन कधीही जाण्यासाठीचा रस्ता नव्हता व नाही. वादी यांनी दाव्यामध्ये बऱ्याच बाबी न्यायालयापासुन लपवल्या असल्याने वादी हे तुर्तातुर्त मनाई मिळणेस पात्र नाहीत त्यामुळे वादी यांचा प्रस्तुतचा अर्ज नामंजुर करावा अशी त्यांनी विनंती केली आहे.

१७. वादी यांनी गट नं. १६ चे पश्चिम बाजुस त्यांच्या घर मिळकती असुन

त्यामध्ये येणेजाणेसाठी दक्षिणोत्तर सामाईक ८ फुट रस्ता असल्याचे कथन केले आहे. निशाणी क्र. ३ सोबत दाखल केलेल्या छायाचित्रामध्ये बोळ असल्याचे दिसत आहे. वादी यांनी सदरील रस्त्याबाबतचा उल्लेख पुर्वी झालेल्या १००/– रुपयेच्या स्टॅम्पवर संमतीपत्र व वाटपपत्रामध्ये उल्लेख केल्याचे कथन केले आहे. अभिलेखाचे अवलोकन केले असता अभिलेखावर वादी यांनी सदरील रस्त्याचा उल्लेख असलेला १००/– रुपयेच्या स्टॅम्पवरील संमतीपत्र व वाटपपत्र हे याक्षणी अभिलेखावर दाखल केले नसल्याचे दिसते. तसेच सदर ठिकाणी रस्ता अथवा बोळ असलेबाबत इतर कोणताही कागदोपत्री पुरावा वादी यांनी अभिलेखावर दाखल केलेला नाही. प्रतिवादी यांनी निशाणी क्र. २० कडे दाखल केलेल्या फेरफार क्र. २३६५ यावरुन दावा मिळकतीचे वाटप हे सन १९९२ पुर्वीच झाल्याचे प्रथमदर्शनी दिसते.

१८. निशाणी क्र. ३ सोबत असलेल्या गट क्र. १६ च्या सातबारा उताऱ्यावरुन प्रथमदर्शनी असे दिसते की, सदरील गटामध्ये वादी क्र. १ यांचे ०.००.४० तर वादी क्र. २ यांचे ०.०१.०० इतके क्षेत्र आहे. तसेच प्रतिवादी क्र. १ आणि इतर ११ लोक यांचे सामाईकात ०.०१.०० आर इतके क्षेत्र आहे. तसेच नगर भुमापन क्र. ६८१ च्या उताऱ्यावरुन असे लक्षात येते की, सदरील क्षेत्र हे प्रतिवादी क्र. २ यांचेकडे वडीलार्जित म्हणुन आहे. वादी यांनी दाखल केलेला सिटी सर्वे क्र. ६८१ च्या नकाशावरुन प्रथमदर्शनी असे लक्षात येते की, सिटी सर्वे क्र. ६८३, ६८४ व ६८० आणि ६८१ यांचे क्षेत्राच्या दक्षिण बाजुस रस्ता आहे. वादी यांनी दाव्याच्या परिशिष्ट क्र. अ सोबत

दाखल केलेल्या कच्च्या नकाशामध्ये सर्वे क्र. ६८१ च्या आजुबाजुस सर्वे क्र. ६८०, ६८४ व ६८३ हे दर्शविलेले नाहीत. यावरुन सर्वे क्र. ६८१ च्या बाबत नगरभुमापन सातारा यांचेकडील दाखल केलेल्या नकाशाप्रमाणे वादी यांनी त्याचे आजुबाजुचे क्षेत्र दर्शविले नसल्याचे प्रथमदर्शनी दिसते.

१९. वादी यांनी परिशिष्ट सोबत दिलेल्या नकाशामध्ये गट क्र. १६ चे पुर्व बाजुस मस्जीद असल्याचे चतुःसिमेमध्ये नमुद केले आहे. प्रतिवादी यांनी त्यांचे म्हणणे सोबत दाखल केलेल्या वंशावळ व सिटी सर्वे क्र. १६ च्या नकाशामध्ये पुर्व बाजुस गट क्र. १६ लगत राऊतवाडी मालगांव रस्ता असल्याचे नमुद केले आहे. प्रतिवादी यांनी निशाणी क्र. २१ सोबत दाखल केलेल्या ग्रामपंचायत मालगांव यांचे ताब्यातील रस्त्यांच्या नोंदवहीमध्ये ग्रामपंचायत चौकापासुन ते शहाबुद्दीन हॉटेल ते मस्जीद पासुन ते बौध्द वस्तीकडे जाणारा रस्ता हा मुख्य रस्ता असल्याचे नमुद केले आहे. यावरुन प्रथमदर्शनी मस्जीद जवळुन मुख्य रस्ता गेल्याचे प्रथमदर्शनी दिसत आहे. त्यामुळे वादी यांनी नकाशामध्ये पुर्वबाजुस गट क्र. १६ च्या लगत रस्ता असलेबाबतची वस्तुस्थिती अभिलेखावर आणली नसल्याचे प्रथमदर्शनी दिसत आहे.

२०. वादी यांचेवतीने निशाणी क्र. ३ सोबत त्यांनी ग्रामपंचायत मालगांव यांचेकडे सामाईक रस्त्यामध्ये प्रतिवादी क्र. १ व ३ खड्डे काढुन रस्ता बंद करण्याचा प्रयत्न करत असलेबाबत दिलेले पत्र दाखल केले आहे. तसेच निशाणी क्र. १९ सोबत वादी यांनी ग्रामपंचायत मालगांव यांचेकडील प्रतिवादी क्र. ३ व विक्रम कदम यांना जाणे

येणेच्या रस्त्यावर खड्डा काढलेबाबत आयोजित केलेल्या मासिक सभेसाठी बोलाविलेबाबतचे पत्र दाखल केले आहे. परंतु वादी यांनी सदरील पत्राच्या अनुषंगाने काय कार्यवाही झाली याबाबतचा कोणताही खुलासा केला नसल्याचे अभिलेखावरुन प्रथमदर्शनी दिसत आहे. प्रतिवादी यांनी निशाणी क्र. २१ सोबत दाखल केलेल्या ग्रामपंचायत मालगांव यांचेकडील नोटीस पाहता सदरील नोटीस ही प्रतिवादी क्र. १ तसेच विनोद कदम वैभव कदम यांचे अर्जावरुन वादी वादी क्र. १ यांना गट क्र. १६ मधील खाजगी जागेत सांडपाणी सोडु नये व ते पाणी पाईपटाकुन ग्रामपंचायतीच्या गटरला सोडावे यासाठी दिले असल्याचे दिसत आहे.

२१. वरील सर्व बाबींचा एकत्रीत विचार करता वादी यांनी त्यांचे अर्जामध्ये आणि दाव्यामध्ये सिटी सर्वे क्र. ८१ मधील प्रतिवादी यांचे घराच्या दक्षिण बाजुस वादी यांचे क्षेत्रामध्ये जाण्यास सामाईक रस्ता सोडण्यात आलेला आहे व त्याचाउल्लेख पुर्वी झालेल्या १००/– रुपयेच्या स्टॅम्पवरील संमतीपत्र व वाटपपत्रामध्ये केला असल्याचा उल्लेख केला आहे. परंतु वादी यांनी अभिलेखावर या क्षण सदरील संमतीपत्राचा स्टॅम्प व वाटपपत्र दाखल केले नसल्याचे दिसते. वादी यांनी कथन केलेला रस्ता हा तेथे अस्तीत्वात असलेबाबत तसेच त्यातुन जाणे येणेसाठी त्यांना अधिकार असलेबाबत कोणताही कागदोपत्री पुरावा याक्षणी अभिलेखावर दाखल केलेला नाही. वादी यांनी वर नमुद केलेप्रमाणे परिशिष्ट अ सोबत दिलेल्या नकाशामध्ये पुर्व बाजुस म्हणजेच दावा मिळकत गट क्र. १६ लागुन मस्जीद असल्याचे वर्णन केल्याचे दिसते. परंतु सदरील

बाजुस मालगांव, राऊतवाडी रस्ता असल्याचे प्रतिवादी यांनी कथन करुन त्याबाबतचा नकाशा त्यांनी दाखल केला आहे. तसेच ग्रामपंचायत ताब्यातील रस्त्यांच्या नोंदवहीतील अ.क्र. ९ वर ग्रामपंचायत चौकापासुन ते शहाबुद्दीन हॉटेल ते मस्जीदपासुन ते बौध्द वस्तीकडे जाणारा रस्ता नमुद केले आहे. यावरुन वादी यांनी दाव्यासोबत दाखल केलेला नकाशा हा वस्तुस्थिती प्रमाणे नसल्याचे प्रथमदर्शनी दिसते. वादी यांनी दाखल केलेल्या नगरभुमापन अधिकारी सातारा यांचेकडील सिटी सर्वे क्र. ६८१ बाबतच्या नकाशामध्ये सदरील मिळकतीच्या दक्षिण बाजुस रस्ता असल्याच नमुद आहे. तसेच सदरील मिळतीच्या उत्तर बाजुस सिटी सर्वे क्र. ६८० आणि दक्षिण बाजुस व पुर्व बाजुस सिटी सर्वे क्र. ६८२ व पश्चिम बाजुस शेती असल्याचे नमुद आहे. यावरुन वादी यांनी दाव्यासोबत दाखल केलेला नकाशा हा स्पष्ट वस्तुस्थिती दर्शवित नसल्याचे प्रथमदर्शनी दिसत आहे. सबब वादी कथन करत असलेप्रमाणे बोळरस्ता अस्तीत्वात असलेबाबत व त्याचा वापर करण्याचा अधिकार वादी यांना असलेबाबतचा कोणताही पुरावा याक्षणी अभिलेखावर आलेला नाही. या सर्व बाबींचा विचार करता वादी यांना प्रथमदर्शनी केस नाही. न्यायाचा तराजु वादीच्या बाजुने झुकत नाही. वादी यांचा प्रस्तुतचा अर्ज नामंजुर झाल्यास वादी यांचे नुकसान होणार नाही. उलट प्रस्तुतचा अर्ज मंजुर झाल्यास प्रतिवादी यांना त्यांचे क्षेत्रात बांधकाम करता येणार नाही. त्यामुळे त्यांचे नुकसान होणार आहे. सबब मी मुद्दा क्र. १ ते ३ बाब माझे निष्कर्ष नकारार्थी नोंदवित आहे.

मुद्दा क्र. ४ बाबत –

२२. मुद्दा क्र. १ ते ३ चे नकारार्थी निष्कर्ष विचारात घेता वादीचा अर्ज नामंजूर होण्यास पात्र आहे. सबब मी खालील आदेश पारित करीत आहे.

आदेश

१. अर्ज निशाणी क्र. ५ नामंजूर करण्यात येतो.

२. खर्चाबाबत आदेश नाहीत.

३. सदर आदेशाची उभय पक्षकारांनी नोंद घ्यावी.

MAHADEOKOLI INDRAJIT GOVARDHAN

Digitally signed by MAHADEOKOLI INDRAJIT GOVARDHAN
Date: 2026.08.05 17:39:21 +0530

(आय.जी.महादेवकोळी)

दिनांकः–०५.०८.२०२६ २ रे सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर, सातारा.